आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

९ जून २०२४ - रविवार

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज सलग तिसऱ्यांदा प्रधानमंत्रीपदाची शपथ घेणार आहेत. त्यांच्यासह नव्या मंत्रिमंडळाला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज संध्याकाळी राष्ट्रपती भवनात होणाऱ्या कार्यक्रमात पद आणि गोपनीयतेची शपथ देतील.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज सकाळी नवी दिल्लीतल्या राजघाट इथं जाऊन महात्मा गांधींना आणि सदैव अटल स्मृतिस्थळावर माजी प्रधानमंत्री अटल बिहारी वाजपेयी यांना आदरांजली वाहिली. त्यांनी राष्ट्रीय युद्ध स्मारकातही पुष्पहार अर्पण केला.

आज सकाळी NDA च्या नेत्यांसाठी त्यांनी चहापानाचं आयोजन केलं होतं. त्यात अमित शहा, जे. पी. नड्डा, एस. जयशंकर, निर्मला सीतारामन, नितीन गडकरी, पीयूष गोयल, रक्षा खडसे, रामदास आठवले, ज्योतिरादित्य शिंदे, चिराग पासवान यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

भारताच्या शेजारी देशांचे आणि हिंदी महासागर प्रदेशातल्या देशांचे प्रमुख प्रधानमंत्र्यांच्या शपथविधी सोहळ्याला उपस्थित राहणार आहेत. आशियातल्या पहिल्या महिला लोको पायलट सुरेखा यादव, पश्चिम मध्य रेल्वेच्या प्रीती साहू, गोंदियाचे लोको पायलट स्नेहसिंह बघेल, नाशिकचे स्वच्छता दूत चंद्रकिशोर पाटील या सोहळ्याला उपस्थित राहणार आहेत.

आकाशवाणीवर संध्याकाळी पावणे ७ वाजल्यापासून या कार्यक्रमाचं वार्तांकन सुरू होईल. त्यामुळं संध्याकाळी ७ वाजता प्रसारित होणारं प्रादेशिक बातमीपत्र संध्याकाळी साडे ६ वाजता प्रसारित केलं जाईल.

आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

९ जून २०२४ - रविवार

**<><><><><>**

संसदेत काँग्रेसची संख्या लक्षणीयरीत्या वाढली आहे, असं काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्ष सोनिया गांधी यांनी म्हटलं आहे. त्या आज नवी दिल्लीत संसदीय पक्षाच्या बैठकीत बोलत होत्या. भारत जोडो यात्रा आणि भारत जोडो न्याय यात्रांमुळे पक्षाला नवसंजीवनी मिळाली, असं सोनिया गांधी यांनी सांगितलं.

**<><><><><>**

मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांच्याबद्दल समाजमाध्यमावर कथितरित्या आक्षेपार्ह वक्तव्य केल्याची चौकशी करावी, या मागणीसाठी सकल मराठा समाजानं आज बीडमध्ये पोलीस अधीक्षक कार्यालयावर मोर्चा काढला. पोलीस अधीक्षकांना निवेदन दिल्यानंतर आंदोलक नेत्यांनी सर्वांना शांततेचं आवाहन केलं.

**<><><><><>**

पंकजा मुंडे यांच्या समर्थकांनी आज परळी तालुक्यात बंद पाळला आहे. पंकजा मुंडे यांच्या विरोधात समाजमाध्यमांवर आक्षेपार्ह पोस्ट व्हायरल झाली होती. संबधित व्यक्तीवर गुन्हा दाखल झाला असला तरी त्याला अजून अटक झालेली नाही म्हणून हा बंद पाळण्यात आला.

**<><><><><>**

कोल्हापुरातल्या तीन अवैध घरगुती गॅस भरणा स्थानकांवर अन्नधान्य वितरण विभागानं काल कारवाई केली. तीन ठिकाणी टाकलेल्या छाप्यात एकूण १ लाख ४५ हजार रुपयांचं साहित्य जप्त केलं.

**<><><><><>**

जेईई एडव्हान्स २०२४ चा निकाल आज सकाळी जाहीर झाला. आयआयटी दिल्लीच्या वेद लाहोटीनं ३६० पैकी ३५५ गुण मिळवत अव्वल स्थान पटकावलं आहे. आयआयटीच्या, jeeadv.ac.in या अधिकृत संकेतस्थळावर  हा निकाल बघता येईल.

**<><><><><>**

टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या अ गटात आज भारताचा सामना पाकिस्तानशी होणार आहे. न्यूयॉर्क इथल्या नासॉ काउंटी स्टेडियमवर भारतीय प्रमाणवेळेनुसार संध्याकाळी आठ वाजता हा सामना सुरू होईल.

**<><><><><>**

बुडापेस्ट इथं आयोजित ‘पोल्याक इम्रे आणि वर्ग जनोस मेमोरियल’ कुस्ती स्पर्धेत भारताच्या रितीका हुड्डा हिनं रौप्य पदक जिंकलं. या स्पर्धेत रितीकानं चारपैकी तीन सामन्यात विजय मिळवला आहे. याशिवाय रितीकानं ७६ किलो वजनी गटात पॅरीस ऑलिम्पिकमध्ये आपलं स्थान निश्चित केलं आहे.

**<><><><><>**

**<u>फ्रेंचओपन/पूल/अंकिता</u>**

फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेत पुरुष एकेरीच्या अंतिम सामन्यात आज स्पेनच्या कार्लोस अल्काराझसमोर जर्मनीच्या अलेक्झांडर झ्वेरेव्हचं आव्हान असेल.

**<><><><><>**

मुंबईत आज नैऋत्य मोसमी पावसाचं आगमन झालं. साधारणपणे ११ जूनला हा पाऊस मुंबईत येतो. त्यातुलनेत २ दिवस आधीच पावसाचं आगमन झालंय.  हवामान विभागाने येत्या दोन दिवसांसाठी कोल्हापूर आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात रेड अलर्ट जारी केला असून मच्छिमारांनी समुद्रात न जाण्याच्या सूचना दिल्या आहेत. रत्नागिरी, ठाणे, रायगड, सातारा आणि पुणे जिल्ह्यासाठी ऑरेंज अलर्ट दिला असून अनेक ठिकाणी १०० मिलिमीटरहून अधिक पाऊस पडण्याचा अंदाज सांगितला आहे. तर विदर्भासाठी यलो अलर्ट जारी केला असून सोसाट्याच्या वाऱ्यासह पाऊसाची शक्यता वर्तवली आहे. मुंबई, ठाणे आणि रायगड जिल्ह्यात वेगवान वाऱ्यासह मुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे.

**//<><><><><>//**